25

दि.२५ /०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक

आरोपी लोकसेवक - श्री मच्छिंद्र बापुराव ससाणे, वय 55 वर्षे, पद- पो.उप.नि. (ग्रेड Psi), नेमणुक- सातारा पोलीस स्टेशन औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रुपये 24000/- रक्कम स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सातारा औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री मच्छिंद्र बापुराव ससाणे, वय 55 वर्षे, पद- पो.उप.नि. (ग्रेड Psi), नेमणुक- सातारा पोलीस स्टेशन औरंगाबाद शहर. रा. ग.नं.01, हनुमाननगर, दत्ताचौक गारखेडा परिसर औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 24000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 24000/- रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदिप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार व इतर यांचे विरुध्द सातारा पो.स्टे. येथे दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार व इतर यांचे विरुध्द सातारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास आ.लो.से. श्री. ससाणे यांचेकडे आहे. गुन्हयात तक्रारदार यांना मदत करण्यासाठी 25000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 25/05/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. ससाणे यांनी तडजोडीअंती 24000/- रुपये पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून संताजी पोलीस चौकीजवळ स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे सातारा औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदिप राजपुत यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो. अं. केवलसिंग घुसिंगे, बाळासाहेब राठोड, दत्तात्रय होरकटे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

25.5.23

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.